22 APR 2017 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो सायन्स अभ्यासक्रमातून परदेशी शिक्षणाची संधी

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी आधुनिक ज्ञान, तंत्रज्ञानाच्या संधी खुल्या करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त सन २०१२ मध्ये 'स्कूल ऑफ नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी'ची स्थापना करण्यात आली. येथे बी.एस्सी.-एम.एस्सी. एकात्मिक अभ्यासक्रम सुरू झाला आणि या अभ्यासक्रमाच्या पहिल्याच बॅचच्या मानसी हुपरीकर या विद्यार्थिनीला जर्मनीमध्ये संशोधनाची संधी मिळाली आहे, तर अद्याप बीएस्सीमध्ये शिकणाऱ्या नीलम यादव या विद्यार्थिनीला ३० लाखांच्या शिष्यवृत्तीसह फ्रान्समध्ये पुढील उच्चशिक्षणाची संधी मिळाली आहे.

शाखेच्या पहिल्या बॅचची विद्यार्थिनी मानसी हुपरीकर सध्या एम.एस्सी. भाग-२ मध्ये शिकते आहे. तिला जर्मनीमधील मारबर्ग येथील जगप्रसिद्ध फिलिप्स विद्यापीठात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक प्रा.डॉ.वोल्फगँग पारक यांच्याकडे इंटर्नशीप करण्याची संधी प्राप्त झाली आहे. सध्या बी.एस्सी. भाग-३ मध्ये शिकत असलेल्या नीलम यादव या विद्यार्थिनीला पुढील दोन वर्षांसाठी तिला इरॅस्मस मुंडस ही सुमारे ३० लाख ६६ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली आहे.

या विद्यार्थिनींना स्कूल ऑफ नॅनोसायन्स टेक्नॉलॉजी अधिविभागाचे समन्वयक विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटीलयांच्यासह डॉ. के.के. शर्मा, आणि डॉ. शिवदत्त प्रभू यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. अधिविभागाचे समन्वयक डॉ. पी.एस. पाटील यांच्यासह आंतरविद्याशाखीय विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत उपस्थित होते.


मानसी हुपरीकर


निलीमा यादव



**'सर्वसामान्य कुटुंबातील मुलींचे भारावणारे यश'**

मानसी हुपरीकर आणि नीलम यादव या विद्यार्थिनींनी मिळविलेले अत्यंत प्रेरणादायी आहे. नीलम यादव ही मूळची उत्तरप्रदेशातील असून तिचे वडील घनश्याम यादव हे पेंटर कॉन्ट्रॅक्टर आहेत. व्यवसायानिमित्त हे कुटुंब कोल्हापुरात स्थायिक आहे. तिने ३० लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळवून आईवडिलांच्या कष्टाचे चीज केले. मानसी हुपरीकरचे वडील प्रमोद हुपरीकर हे इचलकरंजीच्या शाहू हायस्कूलचे मुख्याध्यापक आहेत, तर आई गृहिणी आहे. मानसीला आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संशोधकांसमवेत संशोधन करण्याची संधी मिळते आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे डॉ. पी. एस. पाटील यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
22 APR 2017 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या पहिल्याच बॅचच्या मानसी हुपरीकर हिला जर्मनीमध्ये संशोधनाची संधी मिळाली आहे. तर बी.एस्सी.मध्ये शिकणाऱ्या नीलम यादव हिला ३० लाखांच्या शिष्यवृत्तीसह फ्रान्समध्ये पुढील उच्चशिक्षणाची संधी चालून आली आहे.



**कोल्हापूर : नीलम यादव व मानसी हुपरीकर (डावीकडे) यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्रा. डॉ. पी. एस. पाटील.**

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त २०१२ मध्ये स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीची स्थापना करण्यात आली. या शाखेच्या पहिल्या बॅचची विद्यार्थिनी मानसी हुपरीकर एम.एस्सी. भाग-२ मध्ये शिकते आहे. तिला जर्मनीमधील मारबर्ग येथील फिलिप्स विद्यापीठात प्रा. डॉ. वोल्फगँग पारक यांच्याकडे इंटर्नशीप करण्याची संधी प्राप्त झाली आहे. बी.एस्सी. भाग-३ मध्ये शिकत असलेल्या नीलम यादव या विद्यार्थिनीला फ्रान्समधील पॅरिस-सुड विद्यापीठात पुढील पदव्युत्तर शिक्षण प्राप्त करण्याची संधी मिळाली आहे. त्यासाठी पुढील दोन वर्षांसाठी तिला इरॅस्मस मुंडस ही सुमारे ३० लाख ६६ हजार रुपये इतक्या रकमेची शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्यांना समन्वयक डॉ. पी. एस. पाटील, डॉ. के. के. शर्मा, आणि डॉ. शिवदत्त प्रभू यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

**सर्वसामान्य कुटुंबातील मुलींचे भारावणारे यश**

नीलम यादव ही मूळची उत्तर प्रदेशातील असून तिचे वडील घनश्याम यादव हे व्यवसायानिमित्त कोल्हापुरात स्थायिक झाले आहेत. मानसी हुपरीकर हिचे वडील प्रमोद हुपरीकर हे इचलकरंजीच्या शाहू हायस्कूलचे मुख्याध्यापक आहेत, तर आई गृहिणी आहे.

22 APR 2017 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांसाठी शिक्षण संसाधन केंद्रांचे उद्‌घाटन

## शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयात 'रूसा'च्या निधीतून उभारणी

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत (रुसा) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी नव्याने स्थापित समावेशी शिक्षण संसाधन केंद्राचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह खासदार धनंजय महाडिक प्रमुख उपस्थित होते.

रूसाकडून मिळालेल्या निधीतून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रिसोर्स सेंटर फॉर इन्क्लुसिव्ह एज्युकेशन (आर.सी.आय.ई.) अर्थात समावेशी शिक्षण संसाधन केंद्र ग्रंथालयात उभारण्यात आले आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना अव्यंग विद्यार्थ्यांच्या बरोबरीने शिक्षणाच्या संधी उपलब्ध कराव्यात, त्यांना आवश्यक साधनसुविधा करून द्याव्यात, हा हेतू केंद्राच्या उभारणीमागे आहे. अंध, मूकबधिर, अस्थिव्यंगबाधित, गतिमंद अशा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना साधनांची उपलब्धता करण्यात आली आहे, अशी माहिती केंद्र समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी दिली. केंद्रात ब्रेल पुस्तके, ऑडिओ बुक्स, स्क्रीन रीडिंग सॉफ्टवेअर बसविलेले संगणक, ब्रेल प्रिंटिंग, ई-बुक्स, ई-जर्नल्स, ई-डाटाबेसेस सारखे ई-रिसोर्सेस, वाय-फाय सुविधेसह इंटरनेट, मॅग्निफायर, स्पेक्टॅकल्स यांसारखी अल्पदृष्टी विद्यार्थ्यांना उपयुक्त साधने आदी बऱ्याच सुविधांची उपलब्धता केली आहे. त्याचप्रमाणे येथे दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक प्रशिक्षण तसेच करिअर गाईडन्सही देण्यात येणार आहे. या प्रसंगी शासनाच्या प्रधान सचिव व राज्य प्रकल्प संचालक रुसा मीता राजीवलोचन, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ महाराज विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, रुसा केंद्राच्या समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर, नांदेड विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. शैलेश वढार, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. प्रवीण यन्नावार, शरद पाटील उपस्थित होते.



**कोल्हापूर : बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालयात दिव्यांगांसाठीचे शिक्षण संसाधन केंद्राच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. संजय देशमुख, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक आदी.**